क्र. पोउपआ/शवाशा/प्रशा-१/१७८ /२०२४
पो. उपायुक्त शहर वाहतूक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. १६/०९/२०२४

## वाहतूक नियंत्रण अधिसूचना – सुधारणा

**विषय :–** अधिसुचनेमध्ये सुधारणा होणेबाबत.

**संदर्भ :–** १) OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, १०/०९/२०१८
२) जा.क्र. जा.क्र. पोउपआ/शवाशा/प्रशा–१/१६६/२०२४, दि. ०५/०९/२०२४

*******

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रात दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीत **गणेशोत्सव** हा सण साजरा होणार असून गणेशदमुर्ती विसर्जनाचे दिवशी दिनांक ०८/०९/२०२४ रोजी दीड दिवसांचे गणपती **विसर्जन**, दिनांक ११/०९/२०२४ रोजी पाच दिवसांचे गणपती विसर्जन, दिनांक १२/०९/२०२४ रोजी गौरी गणपती विसर्जन, दिनांक १३/०९/२०२४ रोजी सात दिवसांचे गणपती विसर्जन आणि दिनांक १७/०९/२०२४ रोजी अनंत चर्तुदशी या कालावधीत **गणेश मुर्ती विसर्जन** व मिरवणूकांचे मोठया प्रमाणात आयोजन करण्यात येते. तसेच दिनांक १८/०९/२०२४ रोजी **ईद–ए–मिलाद** हा सण असुन सदर दोन्ही सणानिमित्त जनसमुदाय रस्त्यावर असतो.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडून कोरोना रोगाच्या प्रादुर्भावाचे वेळी लावण्यात आलेले निर्बंध हटविण्यात आल्याने मोठया प्रमाणात जनसमुदाय गणेश विसर्जन व मिरवणुकांमध्ये सामील होणार आहे. जड – अवजड वाहतूक सुरू ठेवण्यात आली त्या दरम्यान गणेश मूर्ती स्थापना किंवा विसर्जन होण्यापुर्वी काही अप्रिय घटना घडू शकते.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर वाहतूक विभागातून तीन राष्ट्रीय महामार्ग व एक राज्य महामार्ग मार्गस्थ होत आहेत. नमूद महामार्गावरून बाहेरील राज्यांमध्ये जाणा–या व बाहेरील राज्यांतून येणा–या वाहनांची वाहतूक सुरू असते. जड – अवजड वाहनांमुळे ठाणे शहर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सव दरम्यान वाहतूक कोंडी होईल. त्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ठाणे शहर वाहतूक विभागातील अंतर्गत मार्गांवर जड – अवजड वाहनांना प्रवेश बंदी बाबत आदेश काढणे आवश्यक असले बाबत माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी,** मी **आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्र. एम.व्ही.ए. –११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून यापुर्वीचे अधिसुचना क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, दि. १०/०९/२०१८ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे.

**प्रवेश बंद –** सर्व प्रकारच्या **जड–अवजड मालवाहतूक** करणा–या वाहनांना ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे सर्व शहरांचे मार्गावरून मार्गस्थ होण्यास गणपती विसर्जन/मिरवणूक दिवशी दिनांक ०८/०९/२०२४, ११/०९/२०२४, १२/०९/२०२४, दिनांक १३/०९/२०२४ रोजी, दिनांक १७/०९/२०२४ रोजी रात्रौ ००:०१ ते गणेश मूर्ती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत तसेच दिनांक १८/०९/२०२४ रोजी ईद–ए–मिलाद मिरवणुक संपेपर्यंत प्रवेश बंद राहील. तसेच दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीत गणपती विसर्जन व दि. १८/०९/२०२४ रोजी ईद–ए–मिलाद दिवस सोडुन इतर दिवशी **जड अवजड वाहनांना** रात्रौ २२:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो वाहतुकीस मुभा देण्यात येत आहे.

**( आशुतोष डुंबरे )**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर

**प्रति,**

संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई

२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना जारी केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रत मा. सविनय सादर**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**
पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–२ भिवंडी, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ–४ उल्हासनगर, परिमंडळ–५ वागळे इस्टेट

**प्रत** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद

**प्रत** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई

**प्रत** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसुचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना